नलिका वितरण प्रणाली सामाईक दरसूची सन २०१९-२० साठी तसेच नलिका वितरण प्रणालीसाठीच्या संकल्पन व विनिर्देशांचे प्रमाणीकरण (Standardization)) करण्यासाठी उच्च स्तरीय तांत्रिक समिती गठित करणेबाबत

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण २०१९/(६९/२०१९)/लपा
मंत्रालय, मुबई-४०० ०३२
दिनांक :- १० जुलै, २०१९.

संदर्भ:- (१) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१९/(६९/२०१९)/लपा, मंत्रालय, मुंबई, दिनांक ११.०२.२०१९
(२) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१९/(प्र.क्र.२/२०१९)/जसं(धोरण), मंत्रालय, मुंबई, दिनांक १२.०२.२०१९
(३) महासंचालक, मेरी, नाशिक यांचे पत्र क्र.जा.क्र.मसं/मेरी/मसंसं/अ.अ.(का)/तां.शा./२६/२०१९, दिनांक १५/०२/२०१९

प्रस्तावना :

उपरोक्त संदर्भाधीन क्र.(१) च्या शासन निर्णयामधील अ.क्र.१२ हा विषय, संदर्भाधीन क्र.(२) च्या शासन निर्णयान्वये हस्तपुस्तिका तयार करण्याकरिता गठीत करण्यात आलेल्या समितीच्या कार्यकक्षेतील अ.क्र.१ मध्ये समाविष्ट असल्याने, संदर्भाधीन क्र.(३) च्या पत्रान्वये महासंचालक, मेरी, नाशिक यांनी संदर्भाधीन क्र.(१) च्या शासन निर्णयामधील मधील अ.क्र.१२ वगळणेबाबत प्रस्तावित केले आहे. त्यास अनुसरून संदर्भाधीन क्र.(१) च्या शासन निर्णयामधील अ.क्र.१२ वगळण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे शासन शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

शासन शुध्दीपत्रक

संदर्भाधीन क्र.(१) च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या समितीच्या कार्यकक्षेमधील खालील कार्यकक्षा या शुध्दीपत्रकाव्दारे वगळण्यात येत आहे.

" (१२) नलिका वितरिका प्रणालीसाठी संकल्पन, संकल्पन पध्दती व विनिर्देश यांचा आढावा घेवून त्याचे प्रमाणीकरण (Standardization) करणे या बाबी उच्च स्तरीय समितीने कालबध्द पध्दतीने शासनास सादर करावयाच्या आहेत."

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१९०७१२१२१०४७१३२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Milind Anand Wani

Digitally signed by Milind Anand Wani
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=811ef2c18db8728b01579fcb3071e86d7af3216659c06a8d34f3d2dda350efea, serialNumber=74547e206b216404acf50aef877b5d61e16ebdf315f88d58c513e53fab55ecf7, cn=Milind Anand Wani
Date: 2019.07.12 12:15:36 +05'30'

(मि.आ. वाणी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत अग्रेषित:-

१. प्रधान सचिव (जलसंपदा) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक
५. मुख्य अभियंता (द. व प्र.) व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. मुख्य अभियंता (ज.सं.) व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. मुख्य अभियंता (पा.) व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव
९. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे
१०. मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, ला.वि.प्रा, औरंगाबाद
११. मुख्य अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक
१२. मुख्य अभियंता (विप्र), जलसंपदा विभाग, पुणे
१३. मुख्य अभियंता (विप्र), जलसंपदा विभाग, अमरावती
१४. मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, नागपूर
१५. मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, जलसंपदा विभाग, मुंबई
१६. अध्यक्ष सामाईक दरसूची (मुख्य अभियंता (विप्र), जलसंपदा विभाग, पुणे) यांना माहितीस्तव प्रत
१७. अधीक्षक अभियंता (कालवे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी
१८. अधिक्षक अभियंता,कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे
१९. ल.पा. कार्यासन संग्रहार्थ